उपसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय या संवर्गाची सन २०११-१२ च्या सुधारित निवडसूचीनुसार नियमित दिनांक सुधारित करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग
शासन आदेश क्र. औसुवआ-१०११/प्र.क्र.५८/कामगार-१
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २३ एप्रिल, २०१८

शासन आदेश

संदर्भः- १. शासन निर्णय, क्र.औसुवआ-१०११/प्र.क्र.५८/कामगार-१, दि. १४/५/२०१२
२. शासन निर्णय,क्र.औसुवआ-०११३/प्र. क्र.३/ कामगार-१, दि.२६/०२/२०१४

संदर्भाधिन शासन निर्णयांन्वये औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयातील उपसंचालक संवर्गाच्या पदोन्नतीच्या कोटयातील उपसंचालक पदावरील पदोन्नतीचे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. त्यानुसार त्यांना जेष्ठतेचे दिनांक देण्यात आले होते. मात्र, तत्कालीन निवडसुची तयार करताना उपलब्ध पदांचा (बिंदूंचा) आरक्षण निश्चितीसाठी व त्याअनुषंगाने पदोन्नतीसाठी विचार न झाल्याने मुळ अर्ज क्र. १६४/२०१६ अन्वये अर्जदार श्री.विनायक लोंढे, उप संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य यांनी त्यांना दिनांक १४/५/२०१२ हा उप संचालक पदावरील पदोन्नतीचा मानीव दिनांक प्रदान करण्यात यावा, यासाठी याचिका दाखल केली आहे. सदर प्रकरणी शासनाने सर्वांगिण विचाराअंती सन २०११-१२ ची सदर निवडसुची सामान्य प्रशासन विभागाच्या पूर्वमान्यतेने, नव्याने आरक्षण निश्चित करुन सुधारित केली आहे.

२. यास्तव शासन निर्णय क्र.औसुवआ-०११३/प्र.क्र.३/कामगार-१,दिनांक २६/२/२०१४ हा व उपसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य या संवर्गाची २०१४ ची निवडसुची अधिक्रमित करण्यात येत असुन, उपसंचालक, औसुवआ या संवर्गाची सन २०११-१२ ची सुधारित निवडसुची (पुरवणी) या आदेशान्वये प्रसिध्द करण्यात येत आहे.

३. सहायक संचालकांना उपसंचालक पदावर संदर्भाधिन दोन्ही शासन निर्णयांन्वये यापूर्वीच देण्यात आलेल्या उपसंचालक पदावरील पदोन्नतीचा नियमित दिनांक सुधारित करुन विवरणपत्रात नमूद केल्यानुसार, त्यांना नियमित पदोन्नतीचा व जेष्ठतेचा दिनांक देण्यात येत आहे.

४. सदर सुधारित निवडसुची व त्याअनुषंगाने देण्यात येणारे नियमित पदोन्नतीचे व जेष्ठतेचे दिनांक हे मा.सर्वोच्च न्यायालयात राज्य शासनाने दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ मधील अंतिम निर्णयाच्या अधिन राहून देण्यात येत आहेत. सदर आदेशामधील सुधारित जेष्ठता दिनांकानुसार सन २०१२ नंतरच्या जेष्ठतासूच्या यथावकाश सुधारित करण्यात येतील.तसेच सुधारीत निवडसूचीस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची यथावकाश मान्यता घेण्यात येईल.

५. सदर शासन आदेश सामान्य प्रशासन विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमाक.११५१/२०१७, दिनांक १७/१०/२०१७,तसेच कार्यासन १६ (ब), दिनांक १७/०२/२०१८, व २९०/२०१८,दिनांक २०/०३/२०१८, अन्वये दिलेल्या समहतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संगणक संकेतांक २०१८०४२३१६५२४१६०१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Satish Bhartiya

Digitally signed by Satish Bhartiya
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Industry Energy and Labour Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2bc2294cab74b107d5cfbd8bda13dc5782df4340706cbae9c3aa79354a2cd32b, serialNumber=5e865d0cdc2a4b33d56e3ba0f1693db677c69e1582ba24d78c4b12a02126e493, cn=Satish Bhartiya
Date: 2018.04.23 16:55:29 +05'30'

(सतिश भारतीय)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

संबंधित सर्व उपसंचालक, व्दारा, प्रभारी संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, मुंबई.

प्रत,

१. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
४. उप सचिव (कामगार-१), उद्योग, उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रभारी संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, मुंबई
६. निवड नस्ती (कामगार -१).

<u>विवरणपत्र “अ”</u>

<u>सुधारीत निवडसुची २०११-१२ (पुरवणी)</u>

अ. क्र.	ज्येष्ठता क्र.	अधिकाऱ्याचे नाव व प्रवर्ग		पदोन्नतीचा प्रवर्ग	सुधारित नियमित दिनांक
१	२३	श्री.हे.र.धेंड	(वि.मा.प्र.)	खुला	१४/०५/२०१२
२	२६	कु. शा.सा. होंदुले	(अ.जा.)	अ.जा.	१४/०५/२०१२
३	२७	श्री. वि.वि. लोंढे	(वि.मा.प्र.)	खुला	१४/०५/२०१२
४	२९	श्री. सु.सा.जोशी	(भ.ज.-क)	भ.ज.-क	१४/०५/२०१२
५	३०	श्री. रा.दि.दहिफळे	(भ.ज.-ड)	भ.ज.-ड)	१४/०५/२०१२
६	३२	श्री. न.अ.देवराज	(अ.ज.)	अ.ज.	१४/०५/२०१२
७	३३	श्री.वि.वि.काटमवार	(अ.ज.)	अ.ज.	१४/०५/२०१२
८	३४	श्री. मा.पां.तोटेवाड	(अ.ज.)	अ.ज.	१४/०५/२०१२